Special Issue August 2019
# विद्यावार्ता®
Peer Reviewed International Refereed Research Journal
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे
## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई
यांच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विषया अंतर्गत
राष्ट्रीय चर्चासत्र

# वृद्धांच्या समस्या कारणे आणि उपाय





संपादक
डॉ.बाळासाहेब मुंडे

51) वृध्दांची समस्या : एक समाजशास्त्रीय विश्लेषण
**प्रा.डॉ.सतीश गंगाराम ससाणे, अहमदपूर** ||158

52) वृद्धांच्या सेवानिवृत्ती नंतरच्या समस्या आणि उपाय
**प्रा.भैयासाहेब धोंडिबा मसुरे, किनगाव** ||160

53) कुटुंबात राहणाऱ्या वृद्धांच्या कौटुंबिक समस्या : संदर्भ देवगाव (रं.)
**डॉ. कालिदास भांगे, देवगाव (रं.)** ||162

54) वृध्दांच्या समस्येवरील उपाय
**प्रा.डॉ.जाधव सुनिल महादेवराव,पाटोदा.जि.बीड.** ||166

55) जेष्ठ नागरीकांच्या समस्यांची सामाजिक कारण मिमांसा
**प्रा.डॉ. सुधीर आ.येवले, शिरूर(का) जि. बीड** ||168

56) सामाजिक सुरक्षा आणि वृध्द कल्याण कार्यक्रम
**प्रा. डॉ. सोंडगे ता.प. माजलगांव जि. बीड** ||171

57) वृध्दांच्या सामाजिक समस्या
**प्रा.डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, परभणी.** ||176

58) वृध्दांच्या समस्या : कारणे आणि उपाय
**प्रा.डॉ.आर.व्ही.मोरे, जि.वाशिम** ||178

59) Problems of the old Age ( Social,Economical &Psychological)
**Asst. Proff. Kshitija B. Deshpande , Parli Vaijnath** ||179

60) वृध्दांच्या समस्या : स्वरुप आणि उपाय
**प्रा.अशोक रामचंद्र गोरे, उस्मानाबाद** ||185

61) वृध्दांच्या समस्या
**प्रा.डॉ.मगर पांडुरंग किसनराव , जि.लातूर** ||187

62) वृध्दांच्या समस्या : कारणे आणि उपाय वृध्दांच्या समस्येवरील उपाय
**प्रा. काचगुंडे एम.डी.,अंबाजोगाई** ||189

63) वृध्दांच्या समस्या आणि उपाय
**प्रा.डॉ.बी.व्ही.मुंडे,अंबाजोगाई** ||191

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta® Peer-Reviewed International Publication
August 2019 Special Issue
0185

60

# वृध्दांच्या समस्या : स्वरुप आणि उपाय

प्रा.अशोक रामचंद्र गोरे
समाजशास्त्र विभागप्रमुख
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

***********

**प्रास्ताविक / पार्श्वभूमी :—**

वृध्दांच्या समस्या भारतासह जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये कमी अधिक प्रमाणात आहेत. आधुनिक भारतीय समाज व्यवस्थेत अतिरिक्त लोकसंख्येची समस्या, बरोजगारीची समस्या, गुन्हेगारीची समस्या, बालकामगारांची समस्या, दहशतवादाची समस्या, वेश्यांच्या समस्या, दारिद्र्यची समस्या, अपघातांची समस्या, स्त्रियांच्या समस्या या समस्यांप्रमाणेच वृध्दांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत.

भारतात आधुनिकीकरण, जागतिकीकरण आणि नागरिकरणाच्या प्रभावामुळे पारंपारिक संयुक्त कुटुंबपध्दतीचे प्रचलन कमी होत आहे. संकुचित दृष्टिकोनाची अपरिहार्यता असलेले केंद्र किंवा विभक्त कुटुंब हा नवीन कुटुंबपध्दतीचा प्रसार जोमाने होत आहे. संयुक्त कुटुंबपध्दतीच्या विघटनाचा एक अपरिहार्य परिणाम म्हणून वृध्दांच्या समस्यांची चर्चा आणि चिंतन होणे आवश्यक आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटीपेक्षा अधिक आहे. आजघडीला आपल्या देशात १० कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या वृध्दांची आहे. भारतात वृध्दांच्या समस्या, अडचणी विविध प्रकारच्या आहेत. परंतु त्या व्यक्तिगणिक वेगवेगळ्या आहेत. मानवी जीवनाची अंतिम आणि अपरिहार्य अवस्था म्हणून वृध्दावस्थेकडे पाहिले जाते. मागील काही दशकात वैद्यकीय क्षेत्रात झालेल्या असाधारण संशोधनामुळे मानवाच्या सरासरी आयुर्मानात वाढ होत आहे. रोगांचे निदान, रोगांवरील उपचार आणि रुग्णांचे पुनर्वसन या संदर्भात क्रांतीकारक बदल होत आहेत. परिणामी सरासरी आयुर्मानात वाढ होत आहे. सरासरी आयुर्मानात वाढ झाली की, देशाच्या एकुण लोकसंख्येत वृध्दांची संख्या वाढणार हे उघड आहे.

भारतात मागील काही वर्षात वृध्दांचे काही प्रश्न तीव्रतेने निर्माण झालेले आपणास लक्षात येईल.

**वृध्दावस्थेचा अर्थ :—**

वृध्दांच्या अनेक प्रश्नांचा एकत्रितपणे आणि सखोल अभ्यास करण्यासाठी 'वृध्दापकाळाचे शास्त्र' (ळमतवदजवसवहलएं बपमदवम व ि्वसक हम) निर्माण झाले आहे. या शास्त्रात वृध्दावस्था स्पष्ट करणाऱ्या व्याख्या दिल्या आहेत.

१) हेन्री आणि क्युमिंग :— जीवनातील महत्वपूर्ण तसेच पूर्णपणे उपयोगी आणि ज्याविषयी अभिलाषा असते, अशा आरंभीच्या काळापासून दूर जाण्याच्या प्रक्रियेला वृध्दावस्था म्हणतात.

२) सामाजिक कार्य ज्ञानकोष :— व्यक्तीच्या जीवन चक्रातील शेवटचा कालखंड म्हणजे वृध्दावस्था होय.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे : —**

१) वृध्दांच्या समस्यांचे स्वरुप लक्षात घेणे.
२) वृध्दांच्या समस्यांची वर्तमान स्थिती अभ्यासणे.
३) वृध्दांच्या समस्यांची उपाययोजना लक्षात घेणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेता आहे. संबंधित विषयावरील संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रातील लेख तसेच काही वेबसाईटस्चा आधार घेण्यात आला आहे.

**गृहितके :—**

१) वृध्दांच्या समस्यांचे स्वरुप मोठे आहे.
२) आधुनिक जीवनपध्दतीचा प्रभाव वृध्दांच्या समस्या वाढवत आहे.
३) वृध्दांच्या समस्यांवरील उपाययोजना अपुऱ्या आहेत.

**विषय विश्लेषण :—**

संयुक्तराष्ट्र संघटनेच्या निर्देशानुसार देशाच्या एकुण लोकसंख्येत वृध्द लोकांचे प्रमाण ७ टक्के पेक्षा अधिक झाल्यास त्या देशात वृध्दांच्या समस्या निर्माण होतात.

भारतातील एकुण वृध्दांपैकी जवळपास ९० टक्के वृध्द असंघटीत क्षेत्राशी संबधित आहेत. अशा वृध्दांना सेवानिवृत्ती वेतन अणि भविष्यनिर्वाह निधी या सारखे लाभ प्राप्त होत नाहीत. साहजिकच ९० टक्के वृध्दांना आपल्या वृध्दापकाळात आर्थिक सुरक्षिततेचा सामना करावा लागतो. भारतातील एकुण वृध्दांपैकी एक तृतियांश वृध्द दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. एकुण वृध्दांपैकी ७५ टक्के वृध्द ग्रामीण भागात वास्तव्य करतात. आधुनिक काळातील वृध्दांच्या समस्या मोठ्य प्रमाणात आर्थिक विवंचनेशी संबंधित आहेत. भभारतात आजही मोठ्य प्रमाणात संस्कारित कुटुंबामध्ये वृध्दांची काळजी घेतली जाते, परंतु आता वृध्दांची जोपासना करण्याच्या परंपरांना मोठ्य प्रमाणात छेद मिळत आहे. संयुक्त कुटुंबपध्दतीचे विघटन, वाढता व्यक्तिवाद, नागरीकरण उद्योग व्यवसायात होत असलेले परिवर्तन आणि सतत वाढत जाणारी महागाई यामुळे देखील वृध्दांच्या समस्या निर्माण होत आहेत.

भारतात वर्तमान परिस्थितीत वृध्दांचे समस्यांचे स्वरुप पुढील प्रमाणे आहे.

**१) शारीरिक समस्या** :— वृध्द अवस्थेत शरीर काही प्रमाणात थकते. डोळ्यांना अंधुक दिसणे, हातापायांना कंप, रक्तदाब अनियमित होणे, पचन संस्थेत बिघाड, श्रवणशक्ती कमी होणे, मधुमेह, सांधेदुखी, मुत्रपिंड निकामी होणे, अल्झायमर, दमा यासारख्या समस्या निर्माण होतात.

**२) मानसिक समस्या :—** वृध्दाप काळात विविध शारीरिक समस्यांचा मानसिकतेवर विपरीत परिणाम होतो. नैराश्य, नकारात्मकता, चिडखोरपणा, नाराजी, रागिटपणा, स्मृतिभ्रंश, भ्रमिष्टता यासारख्या समस्या निर्माण होतात.

**३) आर्थिक समस्या** :— वृध्दापकाळात आर्थिक उत्पन्नाचे स्वत:चे असे भक्कम साधन शिल्लक राहत नाही. सेवानिवृत्तीनंतर आर्थिक उत्पन्न कमी होते. वृध्दापकाळात औषधोपचाराचा खर्च वाढतो. असंघटीत क्षेत्रात कष्टाची कामे करणाऱ्या व्यक्तींना वृध्दावस्थेत अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. कनिष्ठ आर्थिक वर्गातील वृध्द व्यक्तींना अधिक समस्यांचा सामना करावा लागतो. अवलंबीत्वामुळे अपमान सहन करावा लागतो.

**उपाययोजना :—**

आज घडीला भारतात १० कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या वृध्दांची आहे. वृध्दांची काळजी घेण्याची संवेदनशिलता व तत्परता हा मोठा प्रश्न आहे. वृध दांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाय करता येतील.

१) वृध्दांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करणे.
२) आरोग्य सेवांचा विस्तार आणि दर्जा वाढविणे.
३) एकाकी, निराधार, अपंग वृध्दांकडे विशेष लक्ष देणे.
४) जेष्ठांचे जीवन आणि मालमत्ता सुरक्षित करणे.
५) जेष्ठांना आवश्यक तेथे सवलती व सुट देणे.
६) ज्येष्ठ व्यक्तीच्या संघटना स्थापन करणे.
७) ज्येष्ठांच्या हितासाठी समाजसेवी संस्थांना प्रोत्साहन देणे.
८) समाजोपयोगी, उत्पादक वार्धक्याची जोपासणा करणे.
९) वार्धक्याशी संबंधित संशोधन आणि विस्तारकार्याला चालना देणे.
१०) वृध्दांसाठी मंत्रालयात स्वतंत्र विभाग स्थापन करणे.
११) वृध्दांसाठी समुपदेशन केंद्राची स्थापना

**निष्कर्ष :—**

१) वृध्दांची समस्या ही एक सामाजिक समस्या आहे.
२) वृध्दांची समस्या सार्वत्रिक समस्या आहे.
३) आधुनिक काळात वृध्दांची समस्या वाढत आहे.
४) भारतात वृध्दांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न वाढविण्याची गरज आहे..
५) वृध्दांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.
६) वृध्दांप्रती संवेदनशीलभाव समाजात वाढविणे आवश्यक आहे.

**संदर्भ :—**

१) 'वृध्दांच्या समस्या : चिंता आणि चिंतन'' — डॉ. दिलीप खैरनार
२) ''वृध्दावस्था'' — विकिपिडीया
३) ''हिंदुस्थानातील वृध्दांच्या समस्या'' — लेख दै. सामना २५ जुलै २०१९
४) ''चतुरंग पुरवणी'' — दै.लोकसत्ता, २० जुलै २०१९

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

February 2020 Special Issue-22 Vol.5

## The Role of Women in Global Development

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editor**
Principal, Dr. Aqueela Syed Gous

Special Issue 22, Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139



29. प्रशासकीय सुधारणा व शास्त्रीय व्यवस्थापन चळवळ — 79
प्रा.संजय अंकुशराव जगताप

30. 'सामाजिकरण व व्यक्तिमत्त्व' — 81
प्रा.गोरे अशोक रामचंद्र

31. ग्रंथालयीन कामांसाठी आय.सी.टी.चे उपयोजन — 83
प्रा.मोरे जयंत हंसराज , प्रा.चिन्देत विलास गोपीनाथराव

32. जलसंवर्धनः लोकसहभागाचे महत्त्व — 85
प्रा.एन.एस.गेडाम

33. बीड जिल्ह्यातील परित्यक्ता स्त्रीयांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या — 88
प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे

34. भारतीय कृषी क्षेत्रातील उत्पादन, उत्पादकता आणि उपलब्धता — 92
प्रा.डॉ. चिताडे नंदकिशोर

35. सामाजिकरणाची भूमिका — 95
प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव

36. 1857 च्या उठावात महिलांचा सहभाग — 99
प्रा.डॉ. कदम एस.आर.

37. प्रशासकीय सुधारणा आणि व्यवस्थापन — 102
प्रा.डॉ. तिडके के.डी.

38. सामाजिकशास्त्र - महिला आणि सामाजिक समस्या — 105
श्री.नोळे बसनदास हिरा

39. २२ ते ४० वयोगट महिलांतील स्थुलता कमी करण्यासाठी वेगवेगळया उपचार पध्दतीचा वापर करून केलेला तुलनात्मक अभ्यास — 110
प्रा. सिमादेवी एस. मुंडे , डॉ. प्रशांत बी. चव्हाण

40. 'सेवाक्षेत्र व आर्थिक विकास' — 113
प्रा.डॉ.वेरळीकर प्रमोद बालाजीराव

41. खेळामध्ये भावनिक परिपक्वतेचे महत्व — 117
डॉ. एम.एस.राठोड , सुरेश कोंडीबा राठोड

42. "महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शेतीची भूमिका" — 119
प्रा. पवार एन.डी., प्रा. रामरूले डि.के.

# 'सामाजिकरण व व्यक्तिमत्व'

प्रा.गोरे अशोक रामचंद्र
समाजिक विभागप्रमुख,व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रास्ताविक :–**

मानवास मानवी व्यक्तिमत्व फक्त सामाजिक वातावरणतच प्राप्त होत असते. ज्या वैशिष्ट्यामुळे मानव हा अन्य प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो ती सर्व वैशिष्ट्ये मानवास केवळ समाजातच प्राप्त होतात. मनुष्य भाषेचा उपयोग करतो, मनुष्य तिन्ही काळाचा विचार करतो, मानव विचार करण्यास शिकतो. या सर्व गोष्टी मनुष्याला केवळ समाजामुळेच शक्य होतात. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला समाजामुळे आणि समाजातच अर्थ असतो. प्रसिध्द विचारवंत ॲरिस्टॉटल यांच्या मते 'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.' खरेतर समाजसुध्दा अनेक व्यक्तींचा मिळून बनलेला आहे. व्यक्ती–व्यक्तींच्या परस्पर प्रक्रियेतूनच समाजाची निर्मिती होत असते. व्यक्ती आणि समाज ह्या एकाच नाण्यांच्या दोन बाजूप्रमाणे आहेत. व्यक्तीशिवाय समाज नाही आणि समाजाशिवाय व्यक्तीला अर्थ नाही. व्यक्ती आणि समाज ह्यांना जोडणरा महत्वपूर्ण धागा म्हणजे सामाजिकरण होय.

व्यक्तीला अनुवंशाव्दारा जन्मताच काही गुणधर्म किंवा क्षमता प्राप्त झालेल्या असतात. व्यक्तीला सामाजिक बनण्यासाठी या क्षमताच महत्वपूर्ण ठरतात. परावलंबित्व, जैवक्षमता, ऐकण्याची क्षमता, बोलण्याची क्षमता, शारीरिक हावभावांचा विशिष्ट अर्थ लावण्याची क्षमता, विचार व कल्पना करण्याची क्षमता इ. क्षमताच पुढे व्यक्तीला सामाजिक बनविण्यास सहाय्यक आणि सामाजिकरणाचा आधार बनतात. सामाजिकरणामुळेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व आकाराला येते. सामाजिकरण नसेल तर व्यक्तीचे व्यक्तिमत्व आकाराला येते. सामाजिकरणाची प्रक्रिया नसती तर समाजाचे अस्तित्व नसते. सामाजिकरण नसेल तर व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडणार नाही. सामाजिकरण तर मनुष्य आणि अन्य प्राणी यांच्यात फरक असणार नाही.

**सामाजिकरणाचा अर्थ :**

1) ''सामाजिकरण म्हणजे मानवप्राण्यास सामाजिक प्राणी बनविण्याचे, मानवास मानवत्व देण्याचे शिक्षण होय.''
2) बोगार्डस :– ''ज्या प्रकियेमुळे व्यक्ती परस्पर सहकार्य एकत्र राहण्यास शिकतात, सर्वांच्या कल्याणासाठी धडपड करतात अशा प्रयत्नाने काही बंधने व नियंत्रणे स्वेच्छेने पाळतात, सामाजिक कर्तव्य बजावताना स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण समतोल विकास साधतात त्या प्रकियेला सामाजिकरण असे म्हणतात.''
3) डॉ.विलास संगवे :– ''नवजात अर्भकाला सामाजिक प्राणी बनविणारी प्रकिया म्हणजे सामाजिकरण होय.''

कुटुंब, मैत्री, नातेसंबंध, शेजारी, कीडा संघ, सामाजिक पर्यावरण, विविध संस्था, समुह, शाळा, मंडळे, सहकारी ही सामाजिकरणाची साधने आहेत.

थोडक्यात – शिकवण्याची, शिकवण्याची, आत्मसात करण्याची प्रकिया म्हणजे सामाजिकरण होय.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :–**

1) सामाजिकरणाची संकल्पना लक्षात घेणे.
2) व्यक्तिमत्वाबाबत संकल्पना लक्षात घेणे.
3) सामाजिकरण आणि व्यक्तिमत्व यांचेतील संबंध लक्षात घेणे.

**शोधनिबंधाची गृहितके :–**

1) सामाजिकरण ही एक व्यापक प्रकिया आहे.
2) व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास सामाजिकरणामुळेच होतो.
3) सामाजिकरण ही शिकण्याची प्रकिया आहे.
4) समाजाचे अस्तित्व व सातत्य सामाजिकरणामुळेच शक्य आहे.

**संशोधनपध्दती / तंत्र :–**

प्रस्तुत शोध निबंध हा व्दितियक (दुय्यम) साधन सामग्रीवर आधारीत आहे. शोधनिबंधासाठी संदर्भग्रंथ, मासिके, विकिपिडीया अशा साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण :–**

सामाजिकरण हे समाजाप्रमाणेच व्यक्तीच्या दृष्टिनेही महत्वाचे असते. व्यक्तीच्या अंगी असणा–या सुप्त क्षमतांच्या विकासाला चालना देऊन व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास करण्यात सामाजिकरण सहाय्यक ठरते. सामाजिकरणामुळेच 'स्व' चा उदय आणि विकास होतो. सामाजिकरणामुळे व्यक्तीवर काही बंधने पडतात. व्यक्तीला स्वतःवर नियंत्रण ठेवण्यास शिकावे लागते. सामाजिकरणामुळे व्यक्तीला सामाजिक नियमांचे पालन करण्यास

शिकावे लागते. ह्या सर्व नियंत्रणात्मक बाबी असल्या तरी सामाजिकरणाव्दारेच व्यक्तीच्या स्व–प्रतिभेचा विका होत असतो.

मानव हा समाजातच राहिल्याने सामाजिक प्राणी बनतो. समाजाव्दारे व्यक्तीवर सतत संस्कार होत असता संस्कारामुळेच व्यक्तीला भाषा, विचार, कल्पना, विश्वास, आदर्श सामाजिक जाणिवा आणि सांस्कृतिक मूल्ये प्रा होत असतात. संस्कारामुळेच व्यक्तीला भाषा, विचार, कल्पना, विश्वास, आदर्श, सामाजिक जाणिवा आ सांस्कृतिक मूल्ये प्राप्त होत असतात. व्यक्तीचे व्यक्तिमत्व निर्धारित करण्यात आणि व्यक्तिमत्वाचा विकास करण्या या बाबी महत्वपूर्ण असतात. व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे समाज आणि संस्कृती यांच्या प्रभावानेच घडत असते.

व्यक्तीच्या व्यक्तिमत्व संकल्पनेत केवळ बाह्य लक्षणांचा समावेश करून चालणार नाही. समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ यांचेबाबत एकमत असल्याचे जाणवते. पार्क आणि बर्जेस यांनी व्यक्तिमत्वाची व्याख्या समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केली आहे. त्यांच्या मते ''कोणत्याही गटातील व्यक्तीची भूमिका ज्या लक्षणांनी निर्धारीत होते त्या समग्र लक्षणांचे संघटित स्वरूप म्हणजे व्यक्तिमत्व होय.'' या समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केली आहे. त्यांच्या मते ''कोणत्याही गटातील व्यक्तीची भूमिका ज्या लक्षणांनी निर्धारित होते त्या समग्र लक्षणांचे असंघटीत स्वरूप म्हणजे व्यक्तिमत्व होय.'' या समाजशास्त्रीय अंगाने करण्यात आलेल्या या व्याख्येत 'भूमिकेच्या कल्पनेस विशेष महत्व देण्यात आले आहे. याचाच अर्थ व्यक्तीला समाजात निरनिराळ्या भूमिका वठवाव्या लागतात, आत्मसात कराव्या लागतात. त्यासाठी सामाजिकरणाची भूमिका अनन्यसाधरण ठरते. सर्व भूमिकांची संकिर्ण व्यवस्था म्हणजे व्यक्तिमत्व असेही म्हणता येईल.

**सारांश :–**

सामाजिकरण व व्यक्तिमत्व याबाबत झालेल्या विवेचनाच सारांश खालीलप्रमाणे आहे.

1. समाजिकरणामुळेच व्यक्तीच्या 'स्व' चा म्हणजेच स्वतः विषयीच्या जाणिवांचा आणि व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.
2. समाजिकरण म्हणजे मानवप्राण्यास सामाजिक प्राणी बनविण्याचे, मानवाला मानवत्व देण्याचे निरंतर चालणारे शिक्षण होय.
3. समाजिकरणाच्या प्रकियेमुळेच व्यक्तीमधील सुप्त–जैव क्षमतांचा व गुणांचा विकास करण्याची संधी प्राप्त होते व मानवाच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.
4. समाजिकरणामुळेच व्यक्तीच्या मनात गट, समुदाय, समाज आणि आपल्या संस्कृतीविषयी आस्था आणि निष्ठा निर्माण होते.
5. विविध भूमिकासाठी परिपक्व बनण्याच्या प्रकियेतूनच व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो त्यासाठी सामाजिकरणाची प्रकिया अनिवार्य आहे.
6. व्यक्तिमत्वाचा उदय किंवा विकास हा 'स्व' चाच उदय किंवा विकास असून व्यक्तीस 'स्व' विषयक जाणीव तिच्या इतरांबरोबरच्या पारदर्शक आंतरकियांचाच परिपाक असतो.

**निष्कर्ष (समारोप) :–**

1. सामाजिकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
2. समाजिकरण ही शिक्षणाची प्रक्रिया आहे.
3. स्माजाची निर्मिती, अस्तित्व, सातत्य व विकास सामाजिकरणामुळेच शक्य आहे.
4. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास सामाजिकरणामुळेच होतो.
5. व्यक्तीच्या जन्मतः असणा–या क्षमतांना विकसित करण्याचे कार्य सामाजिकरणामुळे होते.

**संदर्भ :–**


1. 'समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना'– डॉ.राम वाघ, प्रा.मलवाडे, न्यू रचना प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती सप्टें.1997
2. 'समाजशास्त्रीय संकल्पना व व्याप्ती' – डॉ.ज्योती डोईफोडे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद सुधारित आवृत्ती जून 2013
3. 'समाजशास्त्राची रूपरेषा' – प्रा.ज्योती डोईफोडे, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, सुधारीत दुसरी आवृत्ती, डिसेंबर 2009
4. 'समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना' – डॉ.साळुंखे सर्जेराव नरेंद्र प्रकाशन, पुणे 1996
5. 'समाजशास्त्राची मूलतत्वे' – डॉ.मेहंदळे यशवंत, मेहंदळे प्रकाशन, पुणे 1973

ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 65

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Prof.G.V.Baviskar
Head, Dept. of History
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Dr. B.V.Gund
Head, Dept. of Pol.Sci.
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Prof. B.J.Kukde
Head, Dept. of Sociology
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Chief Editor
Prof. Pramod Tandale

| Sr No | Author Name | Title of Article | Page No. |
|---|---|---|---|
| 45 | प्रा. धनाजी दौलतराव भोसले | भारतातील समकालीन समस्या आणि महात्मा फुले यांच्या विचारांची आवश्यकता | 139 |
| 46 | प्रा. शितल लहू बोडके | महिला सबलीकरण आणि सदयास्थिती | 141 |
| 47 | सौ. साक्षी खेडेकर | सोशल मिडियातील तरुणाई... | 143 |
| 48 | प्रा. अशोक रामचंद्र गोरे | सामाजिक न्याय | 146 |
| 49 | प्रा. डी. एम. शिंदे | भारतातील वाढती लोकसंख्या -एक सामाजिक समस्या | 148 |
| 50 | प्रा. सौ. संगिता पाटील | भारतातील वाढती लोकसंख्या–परिणाम | 150 |
| 51 | श्री. बापू तुकाराम बाराते | लोकसंख्या वाढीच्या समस्या | 152 |
| 52 | प्रा.माधव उत्तमराव उगिले | महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय | 154 |
| 53 | प्रा.डॉ. नागोराव संभाजी भुरके | लोकसंख्या वाढ एक समस्या | 157 |
| 54 | Dr.Sainath Radhesham Bansode | Problems of Population in India | 159 |
| 55 | Mr. Jagadananda Ray<br>Dr. S. J.Chandrashekhar | The Role of Yoga for the Development of Human Values | 161 |
| 56 | Dr. Chandrakant Kamble | Social Issues In The Globalization Age | 163 |
| 57 | **प्रा. डी.डी. गायकवाड** | **सामाजिक न्याय - राजर्षी छ. शाहू महाराज : एक समाजशास्त्रीय अभ्यास** | 166 |
| 58 | Aparna Vishwanath Kalyankar | A Study on Issues and Challenges of Women Empowerment in India | 168 |
| 59 | प्रा.बी.जे.कुकडे | लिंगभेदाची समस्या | 172 |
| 60 | प्रा.प्रकाश साहेबराव काळवणे | भारतातील लोकसंख्येची समस्या | 175 |
| 61 | प्रा. शरद शंकर गायकवाड | महिलांचे सशक्तीकरण व महिला चळवळी एक समाजशास्त्रीय दृष्टीकोन | 178 |
| 62 | प्रा. जे. एन शितोळे | लोकसंख्यावाढीतील आहार आणि पोषण विषयक समस्या | 180 |
| 63 | प्रा.सौ.माधुरी गोविंद गिरी | लोकसंख्या वाढीची समस्या | 183 |
| 64 | प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड | स्त्री-पुरुष असमानता निर्मूलनाचा दृष्टिकोन | 185 |

# सामाजिक न्याय

**प्रा.अशोक रामचंद्र गोरे**
समाजशास्त्र विभाग
व्यंकटेश महाजन महाविद्यालय उस्मानाबाद

## प्रास्ताविक :-

न्याय ही बहुआयामी संकल्पना आहे. स्वातंत्र्य, बंधुत्व आणि समता ही न्यायाची अविभाज्य अंगे आहेत. ख्रिस्तपूर्व काळात ग्रीक तत्त्ववेत्ते प्लेटो आणि ॲरिस्टॉटल त्यानंतर जॉन रॉल्स आणि कार्लमार्क्स यांनी न्यायाच्या संकल्पनेबाबत आपले सिद्धांत मांडले आहेत.

सामाजिक न्याय ही मोठी आणि अविरत चालणारी प्रक्रिया आहे. अविरत या अर्थाने की, समाजात अद्यापही सामाजिक न्याय पूर्णपणे स्थापित झालेला नाही. सामाजिक न्याय ही नीतिमूल्यांवरआधारलेली संकल्पना आहे. कोणत्याही समाजात त्रासाने, वेदनेने ग्रासलेले व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह असतात. वेदना आणि त्रासमुक्त समाज निर्माण करणे हा सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा व्यापक उद्देश असतो. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी दु:ख आणि समस्याग्रस्त लोकांना संघटित करून न्याय मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करणे हा मार्ग सामाजिक न्यायाचा आहे. परंतु, विध्वंसक प्रयत्न किंवा आंदोलने सामाजिक न्याय प्राप्त करण्याचे योग्य माध्यम नव्हे. सामाजिक न्यायाची प्राप्ती लोकशाही मूल्यांच्याचौकटीत आणि सनदशीर मार्गाने झाली पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा नारा दिला, महात्मा गांधी यांनी समाजाला संघटित होण्याचे आवाहन केले, लोकमान्य टिळकांनी समाजाला संघटित होण्याचा मंत्र दिला, कार्लमार्क्स यांनी जगातील कामगारांनो एक व्हा, हा नारा दिला. या सर्वांचेच सूत्र सामाजिक न्यायाचे होते. समाजव्यवस्था आणि सामाजिक व्यवस्थापनाशी संबंधित सामाजिक न्यायाची संकल्पना आहे. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीकडे जाणारी ही संकल्पना आहे. जागतिक स्तरावर 20 फेब्रुवारी हा 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून संयुक्तराष्ट्र संघटनेने जाहीर केला आहे. 2009 पासून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. महाराष्ट्र शासनाने 26 जून हा 'सामाजिक न्याय दिन' म्हणून राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त घोषित केला आहे.

सामाजिक न्याय म्हणजे शोषण विरहित समताधिष्ठित न्याय समाजाची निर्मिती होय.

## शोध निबंधाचीउद्दिष्टे :-

1) सामाजिक न्यायाची संकल्पना लक्षात घेणे.
2) सामाजिक न्यायाचे स्वरूप आणि व्याप्ती अभ्यासणे.
3) आधुनिक काळात सामाजिक न्यायाची उपयुक्तता तपासणे.
4) सामाजिक न्यायाचे महत्व लक्षात घेणे

## शोधनिबंधाचीगृहितके :-

1) सामाजिक न्यायाची संकल्पना व्यापक आहे.
2) सामाजिक न्याय ही बहुआयामी संकल्पना व्यापक आहे.
3) सामाजिक न्याय ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे.
4) सामाजिक न्याय साध्य करण्याची अनेक माध्यमे आहेत.
5) सामाजिक न्याय हा सक्षम लोकशाहीचा आधार आहे.

## संशोधनपद्धती/तंत्र :-

प्रस्तुत शोधनिंबध हा द्वितियक साधन सामग्रीवर आधारीत आहे प्रस्तुत शोधनिंबधासाठी संदर्भग्रंथ मासिके, विकिपिडीया आणि विकासपिडीया या साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

**विषय विश्लेषण :-**

आधुनिक काळात जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक विस्तारत आहे. जागतिक नागरिक ही संकल्पना मोठ्या गतीने वाढताना दिसते आहे. जागतिक पातळीवर सर्वांगीण प्रगती करणे हा उद्देश 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचा आहे. गरिबी, बेरोजगारी, वर्णभेद, लिंगभेद, जातीभेद, धर्मभेद, पंथभेद, शिक्षण असमानता, सामाजिक विषमता, आर्थिक विषमता यामुळे सर्वसमावेशक विकासाची संकल्पना साध्य होताना दिसत नाही. जागतिक स्तरावर असे चित्र असल्याचे लक्षात येते. सर्वसमावेशक, सर्वांगिन विकास साध्य करण्यासाठी 'सामाजिक न्याय' ही प्रक्रिया अधिक गतिमान करणे गरजेचे आहे.

वैयक्तिक, सामाजिक, संस्थात्मक आणि शासकीय पातळीवर सामाजिक न्यायाची प्रक्रिया राबवली जाते. अनेक प्रकारच्या समाजाभिमुख कार्यामधून 'सामाजिक न्याय' साध्य करणे शक्य आहे. समाजात अनेक घटक वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित असतात. अनेकदा अशा घटकांच्या दैनंदिन गरजा देखील पूर्ण होत नाहीत. अशा घटकांना आपल्या गरजा सहज पूर्ण करता याव्यात व समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी 'सामाजिक न्याया'ची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. सामाजिक न्यायाची संकल्पना मानवी हक्काला जोडली जाणे आवश्यक असते. मानवी हक्कांच्या अभावी समाजातील हा घटक नाराज असतो. त्यांच्या मनात व्यवस्थेबद्दल असंतोषाची भावना असते हा असंतोष कमी करण्यासाठी सामाजिक न्यायाची प्रक्रिया महत्त्वपूर्ण कार्य करते.

समाजाच्या अनेक क्षेत्रात उपेक्षित वंचित घटक आहेत. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे आवश्यक आहे. असे समूह सहसा असंघटित असतात यामध्ये दलित, अल्पसंख्यांक, आदिवासी, स्त्रिया, अपंग (दिव्यांग), निराधार, बालकामगार, कामगार, शेतमजूर, अशिक्षित, कुपोषित, झोपडपट्टीत वास्तव्य करणारे, वृद्ध, संकटग्रस्त शेतकरी, शेतमजूर स्त्रिया, दारिद्र्यात जीवन जगणारे, विषमतेचे बळी, कुप्रथांचे बळी यांचा समावेश होतो. या सर्व घटकांच्या अनेक समस्या आहेत. अशा घटकांना संघटित करून त्यांना मानवी हक्कांची जाणीव करून देणे व सनदशीर मार्गाने मागण्या मांडणे व त्या पूर्ण करून घेणे ही सर्व प्रक्रिया सामाजिक न्यायासाठी आवश्यक आहे. वेठबिगारी, गुलामगिरी, श्रीमंताची गुलामगिरी यापासून मुक्त समाज हे ध्येय 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचे आहे. सामाजिक न्यायाचे वातावरण तयार करणे हे शासनाचे काम आहे.

भारताच्या संविधानात समाविष्ट असलेली सामाजिक न्यायाची संकल्पना ही समाजातील असंतुलन नष्ट करून कल्याणकारी राज्यात प्राधान्य देणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत सामाजिक न्यायाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. डॉ. आंबेडकरांना नवसमाज व्यवस्था अपेक्षित होती. मानवमुक्तीचा नवसमाज निर्माण करून सामाजिक न्याय विविध पातळीवर कसा मिळेल याकडे डॉ. आंबेडकरांचाकटाक्ष होता. जातीचे उच्चाटन झाल्याशिवाय सामाजिक न्याय प्रस्थापित होणार नाही असे डॉ आंबेडकरांनावाटत होते.

**निष्कर्ष (समारोप):-**

1) सामाजिक न्यायाची प्रक्रिया निरंतर चालणारी आहे.

2) मानवी हक्कांच्या पुर्ततेशिवाय सामाजिक न्याय पूर्णहोणार नाही.

3) लोकशाही मार्गाने सामाजिक न्यायाची पूर्तता होऊ शकते.

4) असंघटित क्षेत्रातील लोकांचे सनदशीर मार्गाने संघटन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ:-**

1) 'भारतीय समाज' (संरचना और परिवर्तन) - एस.एल.दोशी, पी.सी.जैन.

2) 'आधुनिक राजकीय विश्लेषण', - प्रा.रा.अं.तिसारे, प्रा.चिं.ग.घांगरेकर

3) 'राज्यशास्त्रातील मूलभूतसंकल्पना' - प्रा.डॉ.शैलेंद्र देवळाणकर